पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि. १४/८/२०१७

पुणे महानगरपालिका –सूचना कार्यपत्रिका क्र. १५ (पुरवणी)
ऑगस्ट २०१७

शुक्रवार,दि.१८ ऑगस्ट २०१७ रोजी दुपारी ३–०० (तीन) वाजता भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावांची सूचना (नोटीस) मा.सभासदांकडून आलेल्या आहेत.

:– मा. सभासदांचे प्रस्ताव –:

विषय क्र.१९४

संदर्भ – मा.सौ.कविता वैरागे, मा.प्रिया गदादे व मा.सौ.रेखा टिंगरे यांची सूचना दि.१/८/२०१७

––––

थोर साहित्यीक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती दिनानिमित्त १ ऑगस्ट या दिवशी महाराष्ट्र शासनाने सुट्टी जाहीर करावी अशी विनंती ही सभा महाराष्ट्र शासनास करत आहे.

विषय क्र.१९५

संदर्भ – मा. उल्हास उर्फ आबा बागुल यांची सूचना दि.११/८/२०१७

१) मा. उल्हास उर्फ आबा बागुल, उपमहापौर, पुणे व मा. सौ.सुनंदा देवकर यांचे दिनांक२९/१०/२०१४ चे पत्र
२) दि. २९/१०/२०१४ रोजी झालेला मा.पक्षनते सभेचा निर्णय
३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नावियो/६६१ दि.१२/११/२०१४ अन्वये पाठविलेला अभिप्राय
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/नावियो/९०५ दिनांक ७/१/२०१५ अन्वये पाठविलेला दुरुस्त अभिप्राय
५) दि. २२/१/२०१५ रोजी झालेला मा.पक्षनेते सभेचा निर्णय
६) मा.स्थायी समिती ठ.क्र.२०२५, दि. ३/२/२०१५

––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका, नागरवस्ती विकास येाजना विभागामार्फत युवक कल्याणकारी योजना अंतर्गत हॅलो माय फ्रेंड उपक्रम एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर सुरू करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्यात येत आहे.

१) हॅलो माय फ्रेंड उपक्रम मंगळवार पेठ, पुणे–११ येथील कमला नेहरू हॉस्पिटल या ठिकाणी सुरू करणे विषयक प्रस्तावित होते. हॅलो माय फ्रेंड या उपक्रम करीता इपीबीएक्स सिस्टीम आवश्यक आहे. या करीता कमला नेहरू हॉस्पिटल येथिल इपीबीएक्स सिस्टीमचा वापर करून टोल फ्री क्रमांकद्वारा समुपदेशन करणे करीताचे नियोजन आहे. त्याप्रमाणे टोल फ्री क्रमांक उपलब्ध होणे करीता अनामत र.रू.१५०००/–खर्च आहे. वरील संदर्भांकित पक्षनेते सभेत हॅलो माय फ्रेंड उपक्रम सावित्रीबाई फुले स्मारक भवानी पेठ, पुणे४२ येथे आयोजित करणे विषयक चर्चा झाली आहे. सावित्रीबाई फुले स्मारक, भवानी पेठ, पुणे येथे इपीबीएक्स सिस्टीम उपलब्ध नाही. सदर उपक्रम आयोजित करणे करीता या ठिकाणी इपीबीएक्स सिस्टीम नव्याने खरेदी करणे आवश्यकआहे. याकामी र.रू.५ लाख खर्च अपेक्षित आहे. तरी सदर होणाऱ्या खर्चाचा विचार करीता हा उपक्रम कमला नेहरू हॉस्पिटल, मंगळवार पेठ, पुणे –११ या ठिकाणी सुरू करणे अधिक संयुक्तीक होईल.

२) हॅलो माय फ्रेंड उपक्रम करीता टोल फ्री क्रमांकद्वारा समुपदेशन करणे करीता आवश्यक सॉफ्टवेअर करीताचा खर्च र.रू.२ लाख आहे. या सॉफ्टवेअर मार्फत बल्क एसएमएस पाठविणे, समुपदेशन कामी दुरध्वनीवर झालेली चर्चा रेकॉर्ड करणे एका वेळेस साधारणपणे पाच दुरध्वनीद्वारा समुपदेशन करणेस.

३) हॅलो माय फ्रेंड उपक्रम अंतर्गत समुपदेशन करणे कामी लोकल कॉल करीता र.रू. ०.६० व एसटीडी कॉल करीता र.रू.१.२० खर्च आहे .साधारणपणे सुरूवातीचे काळात प्रति माह ५०० दुरध्वनी द्वारा समुपदेश करणे अपेक्षित आहे. या कामी प्रती वर्ष खर्च र.रू.५०००/–(सदर खर्च मिळणारा प्रतिसाद नुसार कमी अधिक राहील.)

४) हॅलो माय फ्रेंड उपक्रम अंतर्गत समुपदेशक व समन्वयक करीता दोन समुपदेशक व एक समन्वयक प्रत्येकी र.रू.१०,०००/– प्रमाणे होणारा प्रती वर्ष खर्च र.रू. ३,६०,०००/–

५) हॅलो माय फ्रेंड उपक्रम अंतर्गत जाहिरात– वर्तमानपत्र, आकाशवाणी, रेडीओ मिर्ची, छापील साहित्य व इतर तद्नुषंगीक बाबींसाठी खर्च – र.रू.३ लाख

६) हॅलो माय फ्रेंड उपक्रम अंतर्गत वरील अनु. क्र.१ ते ५ प्रमाणे व इतर अनुषंगीक खर्च प्रतीवर्ष एकुण खर्च र.रू.१४,००,०००/–

७) सदरचा खर्च पुणे महानगरपालिका, नागरवस्ती विकास योजना विभागाकडील ४ क युवक कल्याणकारी योजना निधीमधून करणेस.

असा मनपा ठराव क्र.७२९, दिनांक १९/३/२०१५ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १) मा. उल्हास उर्फ आबा बागुल, उपमहापौर, पुणे व मा. सौ.सुनंदा देवकर यांचे दिनांक२९/१०/२०१४ चे पत्र

२) दि. २९/१०/२०१४ रोजी झालेला मा.पक्षनते सभेचा निर्णय

३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नावियो/६६१ दि.१२/११/२०१४ अन्वये पाठविलेला अभिप्राय

४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/नावियो/९०५ दिनांक ७/१/२०१५ अन्वये पाठविलेला दुरुस्त अभिप्राय

५) दि. २२/१/२०१५ रोजी झालेला मा.पक्षनेते सभेचा निर्णय

६) मा.स्थायी समिती ठ.क्र.२०२५, दि. ३/२/२०१५

––––

१) पुणे महानगरपालिका, नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत युवक कल्याणकारी योजनेअंतर्गत हॅलो माय फ्रेंड उपक्रम हा कायम स्वरूपी कार्यरत करण्यात यावा.

२) पुणे महानगरपालिका, नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत क युवक कल्याणकारी योजनेअंतर्गत आर्थिक तरतूद उपलब्ध असून त्यानिधीतून सदरचा खर्च करण्यात यावा.

३) तसेच हा उपक्रम कायम स्वरूपी कार्यरत राहणेसाठी दरवर्षी अंदाजपत्रकात तरतूद उपलब्ध करून घेण्याची संबंधित खात्याची जबाबदारी राहील.

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका **नगरसचिव,**
दि. १४/८/२०१७ **पुणे महानगरपालिका.**

(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची डॉकेटस मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत)